प्रेसनोट दि.३०/०१/२०१७.

बेकायदेशीर शस्त्र बाळगुन जबरी चोरी करणारा आरोपी अटक

सातारा जिल्हयात घडत असलेल्या जबरीचोरीतील गुन्हेगारांना पकडणे बाबत श्री.संदिप पाटील,पोलीस अधिक्षक सो सातारा व श्री.विजय पवार,अपर पोलीस अधिक्षक सो सातारा यांनी श्री.पद्माकर घनवट,पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना विशेष लक्ष घालुन कारवाई करणे बाबत सुचना दिलेल्या होत्या.

दि.१७/११/२०१६ रोजी सुर्यकांत खोत रा.बुध ता.खटाव जि. सातारा हे त्यांचे पत्नी सोबत मोटार सायकलवरुन जात असताना नेरफाटा ता.खटाव येथे आरोपींनी पाठिमागुन मोटार सायकलवरुन येवुन त्यांना धडक देवुन त्यांचे पत्नीची पर्स,मोबाईल वगैरे साहीत्य जबरी चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रार दिल्याने पुसेगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१६९/१६ भा.द.वि.स.क.३९२,३४ प्रमाणे दाखल आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये असताना श्री.पद्माकर घनवट,पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना खास बातमीदरामार्फत बातमी मिळाली की,सदरचा गुन्हा तीन आरोपींनी केलेला असुन ते चोरलेला मोबाईल विकण्याकरीता पुसेगांव ते वडुज जाणाऱ्या रोडवर येणार आहेत,त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी पुसेगांव बस स्टॉप समोरील चौकात सापळा लावुन १६.३० वा.चे सुमारास पुसेगांव ते वडुज जाणाऱ्या रोडवरुन वडुजकडुन पुसेगांव बस स्टॉपकडे येत असलेल्या रेकॉर्डवरील संशयीत आरोपीस पकडले.त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात धारदार तलवार व सदर गुन्हयात चोरलेल्या मोबाईलसह इतर ठिकाणी केलेल्या चोरीतील मोबाईल मिळुन आलेले असुन त्याचेकडे अधिक तपास करुन तो व त्याचे आणखी तीन साथीदारांच्या सोबत केलेले चोरी व जबरी चोरीच्या गुन्हयात चोरलेले कि.रु.२८,७००/- रुपयांचे सॅमसंग, आसुस,एच.टी.सी.,एम.आय कंपणीचे ७ मोबाईल हस्तगत करण्यात आलेले आहेत. आरोपीकडुन हस्तगत झालेले इतर मोबाईल त्यांनी कोठुन चोरले आहेत याबाबत तपास चालु आहे.

तसेच मा.जिल्हयाधीकारी सो सातारा यांनी जिल्हात जमावबंदी आदेश लागु केलेला असताना बेकायदेशीर धारधार तलवार हे शस्त्र बाळगले बाबत कारवाई करणेत आली असुन सदर बाबत पुसेगांव पो.स्टे.ला गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

श्री.संदिप पाटील, पोलीस अधीक्षक सातारा, श्री. विजय पवार, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांचे सुचनाप्रमाणे श्री.पद्माकर घनवट, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.जीवन माने,पोलीस उप निरीक्षक श्री.गजानन मोरे,सहाय्यक फौजदार सुरेन्द्र पानसांडे, पृथ्वीराज घोरपडे, पो.हवा. मोहन घोरपडे, विजय शिर्के, पो.ना. मुबीन मुलाणी, नितीन गोगावले चालक संजय जाधव, विजय सावंत, यांनी या कारवाईमध्ये सहभाग घेतला आहे. श्री. संदीप पाटील, पोलीस अधीक्षक सातारा तसेच श्री. विजय पवार, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी या कारवाईमध्ये सहभाग घेतलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या अधीकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.सातारा.

प्रति,

संपादक ,